Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN : 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -8 | Issue - 2 | March - 2016

# मुस्लिम मराठी कथेतील तलाक्पिडीत स्त्रीची समस्या



**शफिक हुसेन शेख**
प्राथमिक शिक्षक ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इंदिरानगर,मंद्रुप,सोलापूर.

## प्रास्ताविक :-

मुस्लिम मराठी कथाकारानी आपल्या विविध कथामंध्ये अन्य विषयांबरोबरच स्त्रीयांच्या विविध सामाजिक प्रश्नांची चिकित्सा केलेली आहे मुस्लिम धर्मामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे असे सर्व सामान्यांचे मत आहे पण वस्तुस्थिती तशी नाही पुरुषांच्या बरोबरीनेच स्त्रियांना देखील ईस्लामचे समान हक्क देण्यात आलेले आहेत परंतू कालांतराने पुरुषप्रधान संस्कृतीच्या रेट्यामुळे आपोआपच स्त्रियांच्या स्वातंत्र्याची गळचेपी झालेली आहे आणि पुरुषांनी प्रथमस्थान घेतलेले आहे. परंतू समाजात आणि जनसामान्यांच्या मनात मात्र पूर्वगृह किंवा गैरसमज निर्माण झालेले आहेत.

"कसक" या राजन खान यांच्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत सुरुवातीलाच प्रेषित हजरत महंमद पैगंबर साहेबांनी स्त्रियांबद्दलाचे दिलेले विचार महत्वपूर्ण आहेत, "एकदा एक विशेष प्रसंगी हजरत महंमद पैगंबर साहेब एका जमावाला संबोधित करताना पुरुषांना उद्देशून म्हणाले की, मी तुम्हांला स्त्रियांशी चांगले वर्तन करण्याचा खास वारसा देतो आहे. तुम्ही माझा हा वारसा नेहमी स्मरणात ठेवा मग बघा त्या तुम्हांला नेहमीच यश देतील.[१] प्रेषित हजरत मुहंमद पैगंबर साहेबांचे विचार स्त्रियांना समान हक्क देण्याचे आहेत पण कालातंराने मुस्लीम धर्मातील स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे याचे चित्रण मुबारक शेख यांच्या "अम्मी अब्बा किधर है, "ईद", "बरबाद", "इंतजार", "बेवडा", यु.म. पठाण यांच्या "भोग", "साया", "पाश", "तलाक" राजन खान यांच्या "बुबू", "हलाल", "दिन", "जैतून", "ऐब" तर एहतेशाम देखमुख यांच्या "सलमी" इ. कथेतून आलेले आहे. तसेच एहतेशाम देशमुख यांच्या "सुड" " आय.एस.टी.एम फॉर कॅन्सर " "बेगम युरीडीसी", "अंबरा

डोमनी" या कथा देखील स्त्रियांच्या विविध सामाजिक प्रश्नासंदर्भात माहिती देणाज्या आहेत वरील विविध कथांमधुन मुस्लीम स्त्रियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. याचे चित्रण मुस्लीम कथाकारांनी जिवंतपणे आपल्या विविध कथांच्या माध्यमातुन स्त्रियांच्या प्रश्नाना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### तलाकपिडीत स्त्रियांच्या समस्या :-

इस्लाम धर्मामध्ये तलाक हा मोठा संवेदनशील व गंभीर मुद्दा आहे आणि तो स्त्रियांच्या अस्तित्वाची राखरांगोळी करणारा आहे. तलाक हे नंदनीय स्वरुपाचे आहे. कुराण शरीफ मध्ये असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे की, स्त्री व पुरुष दोघे परस्पर अविभाज्य घटक आहेत. जर पुरुषाने स्त्रीला तलाक दिला असेल तर खरोखरच या दोन अविभाज्य घटकांपैकीच एक घटक मुळ घटकांपासुन वेगळा होतो. तलाक देणे म्हणजे आपल्या अवयवांपैकी एक अवयव आपण स्वतःहून कापून टाकणे होय.

मुस्लिम महिलांच्या जिव्हाळ्याच्या तलाक या प्रश्नावरील औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय हा "मैलाचा दगड" ठरावा एवढा महत्वाचा आहे लातुरच्या फातिमाबीने आपला पती दगडू छोटू यांच्या विरुध्द आपल्या तीन मुलांसह आपणांस पोटगी मिळावी म्हणून तलाकनंतर खटला दाखल केला. दगडू छोटूने दुसरे लग्न केलेले होते त्यांने कोर्टात सांगितले की, काझी व दोन साक्षीदारासमक्ष फातीमाबीला त्याने तलाक दिला असल्याने तो तिची पोटगी देणे लागत नाही परंतु लातरच्या न्यायालयाने त्याचे म्हणणे ऐकुन फेटाळून लावले आणि फातिमाबाची अर्ज मंजुर केला.

तलाकची वस्तुस्थिती सिध्द करणे आवश्यक असुन फक्त तलाक दिला असे सांगुन चालणार नाही अशा आधारावर सदर न्याय दिला गेला. तलाक हा न्याय कारणांसाठीच दिला जावा तसेच तलाकपूर्वी पती पत्नीचे समेट घडवण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. यात यश न मिळाले तरच तलाक दिला जावा ह्या कुराणतील आदेशात असलेली मुळ तरतुद कलकत्ता व गुवाहाटी उच्च न्यायालयांच्या निवाड्याचा आधार होती. फातिमाबीच्या केस मध्ये तर नवज्याने तलाक दिल्याचे तिला माहित नव्हते कारण तिच्या पतीने पाठवलेले रजिस्टर पत्र तिने घेतले नव्हते. त्यामुळे कुराणातील आदेशानुसार सबळ व न्याय असे कारण व समेटाचे प्रयत्न या दोन्ही बाबींचा इथे अभाव होता. औरंगाबाद खंडपीठाने याबाबतीत तीन प्रश्न उपस्थित केले होते.

१. कोणतेही कारण न देता केवळ लहरीखातर आपल्या पत्नीस तलाक देण्याचा अधिकार केवळ मुस्लिम पुरुषाला आहे का. ?

२. मुस्लीम कायद्यात तलाकपुर्वी समेटाचे प्रयत्न आवश्यक आहेत का.?

३. पतीने कोर्टात सांगितले की, मी तलाक दिला आहे एवढ्या आधारावर ते मानले जावे की, त्याने योग्य पध्दतीने तलाक दिला आहे याचा पुरावा कोर्टात सादर करावा लागेल.?

मुस्लिम कायदा योग्य तलाक व अयोग्य तलाक अशी विभागणी करतो, आणि अयोग्य तलाकास मुस्लिम कायदा मान्यता देत नाही म्हणून न्यायालयांनी सुध्दा या तरतुदींचा आधार घेवुनच स्त्रियांच्या सार्थ कैवारातुनच न्याय दिलेला आहे असे म्हणता येईल. तलाक संदर्भात असगरअली इंजिनिअर म्हणतात की, "कुराण लहरीपणा ऐवजी न्यायावर भर देते, अन्याय वर्तन करणारा कुराणाच्या गाभ्यावर हल्ला करत असतो, कुराणाच्या गाभ्याची मोडतोड करण्याचा अधिकार धर्मगुरु म्हणजे उलेमांना आणि मुस्लीम वैयक्तिक कायदेमंडळालाही नसल्याचे त्यांचे प्रतिपादन आहे. [२]

मुसलमानांनी कुराणमध्ये घालुन दिलेल्या निर्देशांचे पूर्णपणे पालन न केल्याने मुस्लिम समाजात तलाक ही मोठी समस्या बनलेली आहे. कुराणच्या निर्देशात आणि प्रेषितांच्या आदेशात एकाचवेळी तीनदा "तलाक" म्हटल्याने तलाक होवू शकते हे समजणे सर्वस्वी चुकीचे आहे त्यामुळे महिलांवर अन्याय होवून त्यांच्या विविध समस्या निर्माण होतात याचे चित्रण आपणांस मुस्लीम मराठी कथांमध्ये पहावयास मिळते.

### मुस्लिम मराठी कथेतील तलाकपिडीत स्त्रियांचे चित्रण :-

राजन खान यांच्या "कसक" या कथासंग्रहातील स्त्री व्यक्ती रेखा "बुबु" हिच्या नावाने "बुबु" कथेमध्ये मुस्लिमम समाजातील शोषित पिडीत स्त्रीचे तलाकपिडीत स्त्रिचे जीवन चित्रण रेखाटलेलेआहेत. बुबुचे लग्न वयाने तिच्यापेक्षा दुप्पट असलेल्या एजाजशी होते त्यांचे लग्न फार काळ टिकत नाही बुबु गरोदर होते आणि मोहरमचे पीर बसलेले असताना ती बाळंतपण होते म्हणुन तिचे बाळंतपण एजाजला अपशकुन वाटते म्हणुन तो तिला तलाक देतो. वीस वर्षानंतर एजाज परत आपल्या बुबुकडे योतो आणि म्हणतो की मी तुझ्या सोबत राहणार आहे तेव्हा बुबु विद्रोहाने पेटुन उठते आणि म्हणते "उठो उठो निकलो यहाँ से... जब मेरेकू नही तुम्हारे महेर की गरज तुमने नैय तलाक दिया तो मेरेकू.....? मै आज तुमकू खुला देतींव मेरे घरमे पाव नय रखनीका वापीस"[३] एजाज येवून आपला तलाक शरीयतप्रमाणे झालेला नाही. मी तुला तलाक दिला पण मेहेरची रक्कम दिली नाही म्हणून तो तलाक होवू शकत नाही असे सांगतो. एजाज सारख्या व्यक्तीरेखेतून कथाकाराने इस्लाम मधील तलाकचा गैरवापर करण्याज्या ढोंगी मुस्लिम अनुयायीचे दुटप्पीपणा उजेडात आणलेला आहे. इस्लाम धर्मातील "तलाक" आणि "खुला" या दोन महतवाच्या अंगाचा इथे विचार करण्यात आलेला आहे.

राजन खान यांच्या तलाकपिडीत मुस्लिम महिलांच्या कथेच्या संदर्भात के.जी. पुरोहित आणि जोशी सुधा म्हणतात, "निम्नस्तरातल्या दारिद्र्यपिडीत, रुढीग्रस्त मुस्लिम समाजाचे त्यांनी केलेले मर्मग्राही चित्रण ही मराठी कथेचे आशयाच्या अंगाने मिळालेली एक उल्लेखनीय जोड आहे स्त्रीवर्गाचे अनेक प्रकारे होणारे शोषण हे त्यात केंद्रवर्ती आहे किंबहुना खान यांच्या एकुण कथाविश्वात स्त्रीप्रश्नांना प्राधान्य मिळालेले

दिसले. सामाजिक वास्तवाचा त्यातील पेच प्रश्नाचा धर्म, जाती निरपेक्ष मानवतावादी दृष्टीकोनातुन अन्ववार्थ लावण्याची भूमिका त्यांच्या लेखनाला श्रेयस्कर ठरली आहे." [४] राजन खान यांनी मुस्लीम स्त्री प्रश्नाची केलेली चिकित्सा ही धर्मवादी दृष्टीकोनातून केलेली नाही तर एक मानवतावादी दृष्टीकोनातून केलेली आहे.

मुबारक शेख यांच्या "नमाज आणि महाआरती" या कथेतील नयिका आस्मा ही पदवीधर असते ती एका ऑफीसमध्ये नोकरी करीत असते ती आधुनिक विचारसणीची तर तिचा पती परंपरावादी विचारसणीचा असतो. इरफानला आस्मा घराबाहेर नोकरी करते हे आवडत नसते म्हणून तीला तो त्रास देत असतो. आस्मा ही स्वावलंबी असते नोकरी करुन ती इरफान पेक्षा जास्त कमावते तिला इरफानची आरेरावी आवडत नसते तरी पण ती इरफानला समजावत असते इरफान आस्माला नोकरी सोडण्यास सांगतो पण ती नोकरी सोडत नाही तेव्हा तिच्या चारित्र्यावर संशय घेतो, शंका घेतो आणि तिला म्हणतो, "तुम लडको जैसे शांन से स्कुटर पे घुमती हो आये दिन बिरादरी के लोग मेरी तरफ इशारा करके जाने क्या क्या बाते करते रहते है ! गैर मर्दो के साथ दिनभर काम के बहाने घर से बाहर रहती हों ! उधर क्या क्या गुल खीलाती हो खुदा जाने!"[५] इरफानच्या अशा विधानाने मात्र आस्माच्या संयमाला तडा जातो आपल्या पतीने जर प्रेमाने जर सांगितले तर नोकरी सोडून दिली असती पण तो जर आपल्या मर्मावरच घाव घालत आहे आता त्याच्या सोबत राहणे योग्य नाही म्हणून ती तलाक घेण्याचा फैसला घेते, "इरफानची आरेरावीवृत्ती, संशय वृत्ती आस्माला असहाय्य झाली अन् त्याक्षणी सरळ तलाक घेण्याचा फैसला केला आणि ती तडक ऑफीस मधून बाहेर पडली."[६] या कथेतील व्यक्तीरेखा आस्मा ही आधुनिक स्त्रीची प्रतिनिधित्व करते अन्यायाच्या विरोधात बंड करणारी व शेवटी पतीलाच तलाक देणारी बंडखोर व्यक्तीरेखा आहे.

जावेद कुरेशी यांच्या "औरंगजेब आणि जोशी" या कथासंग्रहातील "तलाक ते मंडी "ह्या कथेमध्ये तलाक मुळे उद्ध्वस्त जीवनाची घडी बसविणाऱ्या एका स्त्रीची कथा सांगितलेली आहे. पतीने तलाक दिला म्हणून रडत न बसता आपल्या घरचा उंबरठा ओलांडून मंडी मध्ये भाजीचे दुकान लावून संघर्ष करणाऱ्या रजियाची ही कथा आहे. कलीमने तलाक दिला म्हणून कुढत बसण्यापेक्षा मंडी मध्ये भाजीचे दुकान लावून समाजाला न घाबरता ती आपले भाजीचे दुकान नेटाने चालविते आणि आपले उर्वरित आयुष्य सजवते कथेतील रजियाचा आत्मविश्वास इतर स्त्रियांनाही प्रेरणा देणारा आहे. म्हणून डॉ. अक्रम पठाण म्हणतात की, "जावेद कुरेशी हे परिवर्तनवादी विचारसरणी आणि सामाजिक बांधलकी जपणारे कथाकार आहेत आणि त्यामुळे त्यांच्या कथेतील पात्रे देखील तेवढ्याच आत्मविश्वासाने विषमतेचे, धर्माच्या परंपरावादाचे, समाजाव्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेचे चटके सहन कराणारी आहेत. "[७]

मुमताज रहिमतपुरे यांच्या 'प्राजक्त' कथासंग्रहातील 'तलाक' ही कथा नर्गिसची शोकांतिका आहे. नर्गिसला तलाक मिळतो ते तिच्या कुरुपतेमुळे, तिचा पती एक सुंदर स्त्रीच्या प्रेमात पडतो तिच्या सोबत लग्न करण्यासाठी तो आपल्या पत्नीला कुरुपतेचा बहाणा करुन नर्गिसला तलाक देऊन तिच्या जिवनाची राख रांगोळी करतो. इस्लामी पारंपारीक पध्दतीनुसार लग्नापूर्वी आई वडीलांनी मुलासाठी मुलगी पसंत करायची आणि तिच्याशी लग्न करायचे यामुळे आई वडिलांने पसंत केलेल्या मुलीशी लग्न झाल्याने लग्नानंतर अशा समस्या उदभवतात कथेतील नायिका नर्गिसला हे जेव्हा कळते तेव्हा ती म्हणते, 'हिदु स्त्रीयांचे नशिब कसं चांगल आहे. त्यांना कायद्याने सवतबंदी आहे, शिवाय घटस्फोट, तलाक आमच्या सारखं स्वस्त नाही केव्हा होणार सवतबंदीचा कायदा मुस्लिम स्त्रीयासाठी. तोपर्यंत हजारो स्त्रियांचे बळी जात आहेत.' [८] अतिशय आगतिकपणे स्वतःच्या आयुष्यावर कोसळलेली ही तलाकची कुऱ्हाड इतर स्त्रियांच्या जीवनावर कोसळू नये म्हणून ती कायदेशीर संरक्षणाचा टाहो फोडत आहेत.

## समारोप :-

राजन खान, मुबारक शेख, जावेद कुरेशी, मुमताज रहेमतपुरे, इत्यादी मुस्लिम कथाकारांनी 'तलाक' मुळे मुस्लिम महिलांची परवड कशाप्रकारे होत आहे. याचे चित्रण आपल्या कथाच्या माध्यमातून समाजासमोर आणले आहे. कारण नसताना मुस्लिम पुरुष शरीयतचा दाखला देऊन चार-चार बायका करतात, आणि अतिशय फुटकळ कारणे देऊन त्यांना तोंडी तलाक देऊन इस्लामचे विकृतीकरण करत आहेत. शरीयतीच्या कायदयामध्ये दैवी आदेशाबरोबरच वेळोवेळी मानवी हस्तक्षेपांनी आणि संशोधनाने त्यामध्ये बदल होत आहे. मध्ययुगीन, संस्कृतीक, सामाजिक, मानसिकतेचा, प्रभाव वेळोवेळी झालेल्या हस्तक्षेपामुळे स्त्रियांचा उंचावलेला दर्जा पुन्हा खाली आलेला आहे. भारतीय मुस्लिम पर्सनल लॉ मध्ये आवश्यकतेनुसार बदल करुन स्त्रियांना न्याय देण्याची मागणी व अपेक्षा विचारवंतानी व्यक्त केलेली आहे ती अगदी रास्त आहे. या संदर्भात असगरअली इंजिनीयर म्हणतात, "व्यक्तीनिष्ठ मानवी भूमिका ही महत्वाची असते, आणि ही भूमिका तत्कालीन सामाजिक मानसिकतेने घडत असते म्हणूनच उच्च न्यायालयाने महिलांच्या बाजूने प्रगतशील निकाल दिलेले आहे व देत आहेत. "[९] स्त्रियांची होणारी परवड थांबवण्यास समाजाने प्रागतिक पाऊल उचलण्यासाठी आपली मानसिकता आणि विचारामध्ये बदल करण्याचे गरजेचे असल्याचे इंजिनियर म्हणतात.

## संदर्भ सूची


१. खान राजन - कसक, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई, प्रस्तावना.
२. सबनिस श्रीपाल - आदिवासी, ख्रिश्चन, मुस्लिम साहित्य मीमांसा, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००३ पृ.क्रं, १५१.
३. खान राजन - "कसक" मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई पृ.क्रं. १४०

४. पुरोहित के. जी. व जोशी सुधा(संपा.) मराठी कथा विसावे शतक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्र. आ. २००४ पृ.क्र. ८५
५. शेख मुबारक - नमाज आणि महाआरती प्रचार प्रकाशन कोल्हापूर प्र.आ. १९९३, पृ.क्रं.६४
६. शेख मुबारक- नमाज आणि महाआरती, प्रचार प्रकाशन कोल्हापूर प्रआ.१९९३ पृ.क्र.६४.
७. पठाण अक्रम - मुस्लिम मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर प्र.आ. २०१४ पृ.क्र. २२४.
८. रहीमतपूरे मुमताज- प्राजक्त, साधना प्रकाशन पुणे, प्र.आ.२००९ पृ.क्र.११०.
९. सबनिस श्रीपाल - आदिवासी, ख्रिश्चन, मुस्लिम साहित्य मीमांसा, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००३ पृ.क्रं, १५२.